। न हिं ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।

छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळ वडूजचें

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

ता. खटाव जि.सातारा



## भूगोल विभाग

पेपर क्र. १२

# जम्मू-काश्मिर

मार्गदर्शक

प्रा. गोडसे डी. आर.

अधिव्याख्याता

कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

सन - 2019-20

Scanned with CamScanner

classmate
Date
Page

कॉलेज नाव-
कला व वाणिज्य
महाविद्यालय
वडूज
नाव- खाडे पूनम
बाळू
इयत्ता- T.Y.B.A
प्रकल्पाचे नाव-
जम्मू-काश्मिर
सन- 2019-20
रोल.नं- 493

Scanned with CamScanner

# जम्मू काश्मिर

जम्मू काश्मीर हे भारताच्या उत्तर भागातील महत्वाचे राज्य आहे जम्मू काश्मीरची सीमा हिमाचल प्रदेश व पंजाब या राज्याला जोडलेली आहे. जम्मूकाश्मीरच्या शेजारी अफगाणिस्तान, चीन, पाकिस्तान हे देश आहेत जम्मू-काश्मीरमध्ये एकूण 22 जिल्हे आहेत जम्मू-काश्मीरचे तीन भाग पडतात,

(i) जम्मू (ii) काश्मीर (iii) लडाख

~~जम्मू~~ जम्मू काश्मीरचे एकूण क्षेत्रफळ 85,860 चौ किमी आहे. या राज्याची लोकसंख्या 2011 च्या जनगननेनुसार 1,25,41,302 एवढी आहे. या राज्याची एकूण साक्षरता प्रमाण 68.74% इतकी आहे. या राज्याची शासकीय भाषा उर्दू आहे. जम्मू-काश्मिर राज्यात अनेक भाषा बोलल्या जातात त्याप्रमाणे हिंदी, काश्मीरी, पंजाबी, गुरुशाखी पहाडी इ. जम्मू काश्मिर या राज्यामध्ये प्राण्यांचे प्रतिक म्हणून बारहशिंगी याला मानतात त्याचे प्रमाणे या राज्यात फुलाचे प्रतीक म्हणून कमळ या फुलाला मानतात. तसेच झाडाचे प्रतीक म्हणून चिनार झाड या झाडाला मानतात.

जम्मू काश्मीर हे एक भागांतील समृद्ध राज्यांपैकी एक महत्वाचे राज्य मानले जाते त्यामुळे या राज्यात पिकांच्या उत्पादनात सफरचंद, बदाम, अक्रोड, मोती इ. पिके होतात जातात जम्मू काश्मिर मधील आर्थिक बाजू ही शेती असल्याने व शेतीशी निगडीत व्यवसाय आहेत. भारतातील जम्मू काश्मीर

हे एक महत्वाचे राज्य आहे कि जेथे मुस्ली-म धर्माचे लोक राहतात. जम्मू काश्मीर हे राज्य सर्वात मोठ्या पर्यटन स्थळांपैकी एक आहे. जम्मू काश्मीरच्या राज्यात जास्त यात्रेकरु माता वैष्णवी देवी व अमरनाथ बाबा यांच्या दर्शनासाठी येतात व तेथील निसर्ग सौंदर्य व हिमवृष्टी पाहण्यासाठी गर्दी करत असतात

भारताने जम्मू काश्मीरचा कलम 370 हा अधिकार काढून टाकलेला असून तेथे भारताच्या संविधानानुसार 31 ऑक्टोबर 2019 अॅक्ट राबवण्या-त आला आहे. जम्मू काश्मीर हि भारत व पाकिस्तान या दोन देशाची सिमा असल्याने या देशाच्या सिमेचा वाघा बॉर्डर असे नाव देण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

# जम्मू आणि काश्मिर पुनर्रचना [कलम ३७०]

जम्मू आणि काश्मिर पुनर्रचना विधेयकाला राष्ट्रपती ~~व~~ रामनाथ कोविंद यांनी मंजुरी दिली आणि जम्मू आणि काश्मीर पुनरचना कायदा २०१९ या नावाने हा कायदा ओळखला जाणार असून त्याची अंमलबजावणी ९ ऑगस्ट म्हणजेच हा कायदा मंत्रालयाने जारी केलेल्या राज्यपत्रामध्ये म्हटलं आहे.

जम्मूकाश्मीरच्या घटनेतील ३७० व्या कलमानुसार विशेष दर्जा देण्यात आला होता हा दर्जा मागे घेण्यात आला आहे. त्याच प्रमाणे जम्मू आणि काश्मिर राज्याचे विभाजन करून केंद्रशासित बनवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यापैकी जम्मू-काश्मिरमध्ये विधानसभा असेल मात्र लडाखमध्ये विधानसभा नसेल असे मत रामनाथ कोविंद यांनी जम्मूकाश्मीरच्या पुनर्रचनेबाबत व्यक्त केले आहे. त्याप्रमाणे जम्मू काश्मिर पुनर्रचना कायद्याच्या तरतुदी पुढील प्रमाणे.

Scanned with CamScanner

# कायद्याच्या महत्वाच्या तरतुदी

① कलम ३७० नुसार जम्मू-काश्मिरची एक वेगळी राज्यघटना आहे.

② या कलमानुसार सुरक्षा, परराष्ट्रीय धोरण, अर्थव्यवस्था, दळणवळण या बाबी सोडल्या तर तिथे कोणत्याही कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी जम्मू-काश्मिरच्या विधानसभेची संमती असावी लागते त्यामुळे तिथल्या रहिवाशांनाही नागरिकत्व मालमत्तेची मालकी मूलभूत हक्क या विषयीच्या तरतुदी संपूर्णपणे वेगळ्या आहेत.

③ जम्मू काश्मिर वगळता भारतातल्या इतर कोणत्याही राज्यातील लोक इथे माल विकत घेऊ शकत नाही

④ कलम ३७० नुसार केंद्र जम्मू काश्मीरमध्ये आर्थिक आणिबाणी लादू शकत नाही बाह्य शक्तींनी काही हल्ला केल्यास तेथे आणिबाणी लागू होऊ शकते त्यामुळे अंतर्गत समस्यांमुळे राज्यात अशांतता पसरली असेल किंवा धोका निर्माण झाला असेल तर विधानसभेच्या संमतीनंतर तिथे केंद्रसरकार द्वारे आणिबाणी लागू करता येते.

⑤ केंद्रीय सूचीत किंवा समवर्ती सूचीत ज्या बाबींचा समावेश आहे त्याच बाबी संसदेच्या कार्यक्षेत्रात येतात तिथे राजसूचीतील तरतुदी लागू होत नाही.

Scanned with CamScanner

# जम्मू - काश्मिर आणि कलम 370

जम्मू - काश्मीरमध्ये पहिलं हंगामी सरकार स्थापन केल्यावर नॅशनल कॉन्फरन्सचे नेते शेख अब्दुल्ला यांनी भारतीय संविधानाच्या कक्षेच्या बाहेर राहण्याची शिफारस केली भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समीतीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा या कलमाला विरोध होता डॉ. धी.जी. ज्योतीकर त्यांच्या VISIONARY DR. BABASAHEB AMBEDKAR या पुस्तकात त्यांनी केलेल्या विरोधाचा उल्लेख आहे ते म्हणतात

" काश्मिरला विशेष दर्जा देण्याची मागणी शेख अब्दुल्ला यांनी केली होती मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याला स्पष्टपणे नकार दिला आणि शेख अब्दुल्ला यांना म्हणाले तुमचे म्हणणे आहे की भारताने तुमचे रक्षण करावे रस्ते बांधावे लोकांना धान्य द्यावं मात्र भारताला काहीच अधिकार राहणार नाही हेच तुम्हाला म्हणायचं आहे का? अशी मागणी मी कधीच मान्य करणार नाही."

नंतर या कलमाचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी नेहरूंनी गोपालस्वामी अय्यंगार

यांच्यावर सोपवली 1951 मध्ये राज्याला एक वेगळी घटना समीती स्थापन करण्याची परवानगी दिली नोव्हेंबर 1956 मध्ये ही घटना तयार करण्याची प्रक्रीया पुर्ण झाली.

काश्मीरच्या असलेल्या विशेष राज्याचा दर्जा सुरुवातीला तात्पुरत्या स्वरुपाचा होता मात्र अजूनही हा दर्जा कायम होता हा दर्जा काढून घेण्याची मागणी वारंवारवार झाली होती काश्मीरमध्ये काही मोठ्या समस्या उद्भवली की हा मुद्दा कायमच उद्भवत असतो त्यामुळे हा कायदा 31 ऑक्टोबर 2019 रोजी अमलात आणून व हा कायदा रद्द करुन 2019 ऑक्टोबरच्या जम्मू काश्मीरचे जम्मू काश्मीर आणि लडाख अशा दोन राज्यांमध्ये विभाजन करण्यात आले.

# श्रीनगर

श्रीनगर ही भारताच्या जम्मू आणि काश्मीर राज्याची उन्हाळी राजधानी व राज्यातील सर्वाधिक लोकसंख्येचे ~~सख्य~~ शहर आहे श्रीनगर शहर काश्मीर खोऱ्यात झेलम नदीच्या काठावर वसले असून ते जम्मूच्या 250 km उत्तरेस व दिल्लीच्या सुमारे 800 km उत्तरेस स्थित आहे. 2011 साली श्रीनगरची लोकसंख्या सुमारे 12 लाख होती श्रीनगर ऐतिहासीक काळापासून येथील रम्य हवामान अनेक सरोवरे इ. साठी एक लोकप्रिय पर्यटनस्थळ राहिले आहे.

काश्मीर संस्थानाचे मुख्यालय राहिलेले श्रीनगर भारताच्या फाळणीनंतर वादाच्या भोवऱ्यात सापडले आणि पाकिस्तानच्या ~~आ~~ आगळीकेला घाबरलेल्या राजा हरीसिंगने 26 आक्टोंबर ~~सा~~ 1947 रोजी आपल्या तटस्थ पणा संपुष्टात आणून काश्मीर संस्थानाला भारतात विलीन करण्याचा निर्णय घेतला व श्रीनगर भारताच्या जम्मू आणि काश्मीर राज्याचा भाग बनले परंतु 1996 नंतर तेथे सातत्याने फुटीरवादी व दहशतवादी संघटना कार्यरत आहेत त्यामुळे येथील कायदा व सुव्यवस्था कमकुवत बनली आहे. 2016 साली बुरहान वाणी नावाच्या लोकप्रिय फुटीरवादी नेत्याची भारतीय लष्कराने हत्या केली त्यामुळे काश्मीर खोऱ्यात असंतोषाची प्रचंड लाट उसळली ती आजवर कायम

Scanned with CamScanner

आहे. त्यामुळे श्रीनगर येथील पर्यटन व्यवसाय बंद पडला आहे.

दरवर्षी नेले ऑक्टोबर ह्या उन्हाळी महिन्यादरम्यान जम्मू आणि काश्मिर राज्याचे सर्व कामकाज श्रीनगरमधून चालत व उर्वरीत काळाकरीता राज्याची राजधानी जम्मू मध्ये असते श्रीनगर रस्ते व हवाई मार्गाद्वारे उर्वरीत भारताशी जोडले गेले आहे श्रीनगर रेल्वे स्थानक हे ~~भारत~~ भारतीय रेल्वेच्या.

बारामुल्ला - बनिहाल ह्या 119 कि.मी. लांबीच्या रेल्वेमार्गावर स्थित असून येथून सध्या केवळ डेमू प्रकारच्या गाड्या धावतात. ह्या मार्गावरील पीर पंजाल रेल्वे मार्गावरील पीर पंजाल बोगदा हा भारतामधील सर्वाधिक लांबीचा रेल्वे बोगदा आहे. जम्मू बारामुल्ला रेल्वे मार्ग बांधून पूर्ण झाल्यानंतर श्रीनगरहून जम्मू मार्गे उर्वरीत भारतापर्यंत रेल्वे सेवा शक्य होईल राष्ट्रीय महामार्ग श्रीनगर दिल्ली सोबत व कारगील तसेच लेहसोबत जोडतो श्रीनगर विमानतळ शहराच्या 12km दक्षिणेस स्थित असून येथून देशाच्या बहुतेक सर्व प्रमुख शहरांसाठी थेट प्रवासी विमानसेवा उपलब्ध आहे.

राष्ट्रीय प्रौद्योगिक संस्थान श्रीनगर ही एन.आय.टी पैकी एक असलेली तंत्रज्ञान शिक्षण संस्था तसेच काश्मीर विद्यापीठ येथील प्रमुख शैक्षणीक संस्था आहेत.

# जम्मू-बारामुल्ला रेल्वेमार्ग

| | |
|---|---|
| प्रदेश | जम्मू - काश्मिर |
| सुरुवात - शेवट | जम्मू - बारामुल्ला |
| मालक | भारतीय रेल्वे |
| चालक | उ. प्रदेश |
| तांत्रिक माहिती | |
| मार्गाची लांबी | 345 km (214 मैल) |
| थांब्यांची संख्या | ५ |
| गेज | 1676 mm ब्रॉडगेज |
| विद्युतीकरण | नाही. |

Scanned with CamScanner

# पीर पंजाल रेल्वे बोगदा

भारताच्या जम्मू आणि काश्मीर राज्या
-मधील एक महत्वाचा बोगदा आहे जम्मू बारा
-मुल्ला रेल्वेमार्गाविरील बनीहाल व काजी गुंड
ह्या शहरांनां जोडणारा बोगदा 11.215 Km
(6.969 मैल) लांबीचा असून तो आजच्या
घडीला भारतातील सर्वाधिक लांबीचा तर
आशिया खंडातील 4था क्रमांकाचा लांबीचा
रेल्वे बोगदा आहे जानेवारी 2013 मध्ये हा
बोगदा रेल्वे वाहतूकीस खुला करण्यात आला
या बोगद्याची ~~सरासरी~~ समुद्रसपाटीपासून
सरासरी उंची 1760m (5770 फूट) इतकी आहे
हा बोगदा काश्मीर खोऱ्याला जम्मू आणि उर्व
-रीत भारताशी जोडणारा एक महत्वाचा
दुवा असून जम्मू बारामुल्ला मार्गाचे काम
पूर्ण झाल्यानंतर ह्या बोगद्याद्वारे जम्मू ते
श्रीनगर रेल्वे वाहतूक शक्य होईल.